REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 9 | JUNE - 2019

# आळते गावची भूमाता रेणुका:एक क्षेत्र संशोधन

प्रा. रामचंद्र गुर्लिंग घुले[1] , प्रा. डॉ. रमेश दत्तात्रय गंगथडे[2]
[1]सहा. प्राध्यापक( इतिहास) , मा. व. पा. कन्या महाविद्यालय,इस्लामपूर, ता. वाळवा जि. सांगली.
[2]इतिहास विभाग प्रमुख व मार्गदर्शक क. तु. पवार महाविद्यालय, हडोळती.

## प्रास्ताविक:-



आळते हे गाव हातकणंगले तालुक्यात १७°१०' उत्तर व ७४°३०' पूर्व अक्षाशांवर आहे. हे गाव वारणा नदीच्या खोऱ्यात वसले असून कोल्हापूरच्या ईशान्येला १९.३१ कि.मी. अंतरावरती आहे. गावच्या तिन्ही बाजूला दाट झाडी व टेकड्या आहेत. सन १७६५ ते १८७६ पर्यंत येथे आळते पेट्याचे मुख्य ठिकाण होते. पुढे या पेट्यात नव्या गावाची भर पडल्यानंतर सोयीसाठी हातकणंगले येथे तालुक्याची कचेरी शासनाने हलविली. अठराव्या शतकातल्या अखेरीला कोल्हापूर राज्यात जी धामधूम झाली, त्यामध्ये आळते कसबा हे गाव दोन वेळा जाळण्यात आले.[1]

कोल्हापूर जिल्ह्यातील हे गाव सर्वात वैशिष्टपूर्ण वाटते कारण येथे प्राचीन-मध्ययुगीन काळापासून अनेक धर्मसंप्रदाय एकत्र शांततेने स्वधर्माचरण करत आलेले आहेत. येथील निसर्गरम्य व विस्तिर्ण वातावरणात जैन, बौद्ध, लिंगायत, हिंदू व मुस्लिम धर्माची धार्मिक उपासनेची क्षेत्रे आहेत. आळते गावच्या नामोत्पत्ती विषयी कोल्हापूर जिल्हा गॅझेटिअर मध्ये म्हटले आहे की, याठिकाणी पूर्वी अलता हा तांबडा रंग तयार करण्यात येत असे, यावरून या गावाला आळते कसबा हे नाव पडले असावे.[2] खरे पाहता तांबडा रंग सर्जनाचे रजोद्रव्याचे प्रतिक असून गर्भधारणेसाठी आवश्यक मानले जाते. अर्थात ते मातृत्त्व पोषक-निदर्शक आहे. राष्ट्रकुट नृपती आकालवर्षदेव याच्या शके ८८२ (इ.स.९६०) मधील ताम्रपटात आळते या गावचा नामोल्लेख ‘अलतगे ’ असा असून अलतगे ७०० मधील रिक्कटी (रुकडी) हे खेडे करहाटक प्रांतातील कुरेग्रामचा रहिवाशी आत्रेयसगोत्री देवभट्टाचा पुत्र गोविंदभट्ट यास दान दिल्याचे म्हटले आहे.[3] यावरून हे गाव किती प्राचीन आहे याची कल्पना येते. अलतगे म्हणजे सध्याचे आळते हे गाव यल्लम्मा वा रेणुका देवीची उपासना करणाऱ्या अतिशय प्राचीन आलंपूरशी नाम-उपासना साधर्म्य साधतेच शिवाय राष्ट्रकूट नृपती तृतीय गोविंद याच्या राज्यात आलंपूरचा समावेश होत होता. विशेष बाब म्हणजे आलंमपूर (जि.मेहबूबनगर, आंध्रप्रदेश) हे लज्जागौरी उपासनेसाठी प्रसिद्ध असल्याचे सुप्रसिद्ध संशोधक रा. चिं. ढेरे यांनी दाखवून दिले आहे. आळते गावचा विस्तार हा पूर्व-पश्चिम असा असून गावच्या नैऋत्येला दिड-दोन कि.मी. अंतरावर एका माळावर मुरुमाड पडिक शेतात रेणुकेचे (यल्लम्मा) स्थान आहे. रेणुक देवी या गावची ग्रामदवेता असून तिची मार्गशिर्ष शु. १५ (पौर्णिमा) डिसेंबर या तिथीला मोठी यात्रा भरवतात. या देवीची येथील मंदिर स्थापना, दंतकथा, मुलस्वरूप, पूजा-अर्चा इ. माहिती घेऊ.

नमुना शब्द (key word) :- भूमाता रेणुका

## मंदिर स्थापना, दंतकथा व मुर्ती :-

आळते गावच्या रेणुकेचे मंदिर हे कदमांच्या (मराठा-गुरव) शेतात असून सुमारे दोनशे वर्षापूर्वी तिन स्वयंभू तांदळ्यांचा उगमातून रेणुका, मातंगी व परशुराम येथे प्रकट होऊन मंदिराची स्थापना झाली असे येथे सांगण्यात येते. मंदिराचे गुरव श्री. मानसिंग कदम यांनी सांगितलेल्या दंतकथेनुसार जमदग्नि ऋषीच्या भितीने माहूरगडाहून सौंदत्तीस जात असताना वाटेत आळते येथे रेणुका, मातंगी आणि परशुराम यांनी येथे मुक्काम केला होता. तेव्हापासून येथे तिघांचा स्वयंभू जमिनीतून उगवलेला तांदळा आहे.

आणखी एका अख्यायिकेनुसार एक जटाधारी स्त्री या उघड्या फोंड्यामाळावर बसत असे. ती स्वतःला मी रेणुका आहे असे सांगत असे. जेव्हा येथे नांगरणी सुरु झाली तेव्हा तेथे तिन स्वयंभू शिळा मिळाल्या. त्यानंतर ती जटाधारी स्त्री गुप्त झाली. तेव्हा या शिळा रेणुका, मातंगी परशुराम रूपात पुजल्या जाऊ लागल्या.[४] आज मितीला तेच तिन्ही देवतांची तिन स्वतंत्र मंदिरे असून एक गर्भगृह असणारी छोटी मंदिरे आहेत. विशेष म्हणजे गर्भगृहात असणाऱ्या मुलस्वरूप तांदळ्याच्यावरती दगडी जोत्यावर रेणुकेची पुर्णाकृती मुर्ती नव्याने कोणीतरी स्थापन केली आहे. दोन्ही मंदिरासमोर नंदीची पादुका युक्त समाधी आहे. रेणुकेची पुर्णाकृती मुर्ती न पुजता परंपरेने प्राचीन काळापासून तिच्या शिराचीच पूजा करतात रेणुका व मातंगीचे मंदिर शेजारी शेजारी समांतर असून दोन्ही मंदिरे एकगर्भाकृती व शिर युक्त आहेत. ती दगडी बांधणीची असून अत्यंत साध्या बांधणीची चौपळासारखी आहेत. मंदिराच्या मागील भिंतीत फणायुक्त नाग, घट व कमळ कोरलेले आहेत. तिन्ही देवतांच्या मुर्ती काळ्या पाषाणाच्या असून अत्यंत साध्या मराठा कालखंडातील घाटणीच्या आहेत.

## II) पूजा-अर्चा, सण-उत्सव :-

येथील रेणुका-मातंगीचा वार शुक्रवार व मंगळवार असून प्रत्येक पौर्णिमा व अमावस्येला देवीला अभिषेक करून देवीची ओटी भरली जाते. तिला पुरणपोळी व सोळा भाजींचा नैवेद्य दाखवला जातो. मंदिराचे कदम पुजारी रोज पहाटे देवीला गरमपाण्याने स्नान घालून अत्तर तेलाने देवीची आराधना करतात. याशिवाय रेणुकेच्या मंदिरात दुर्गेचा दुर्गोत्सव म्हणजे नवरात्रोत्सव अत्यंत उत्साहात व वेगळ्या पद्धतीने साजरा करतात. हे वेगळेपण म्हणजे येथील हिंदू घरातील प्रत्येकी एक व्यक्ती ९ दिवस उपवास धरून रेणुकेच्या मंदिरात साधना-ध्यानधारणा करतात. फक्त दुध आणि फळे-कंदमुळांचा आहार आदिम रानटी जीवन व्यवहाराप्रमाणे करतात. रेणुका व मातंगीच्या मुर्तीपुढे एक नव्हे तर प्रत्येकी दोन-दोन घट बसवीतात.

दुर्गेचा येथे घट बसविणे, वारूळाची पूजा होणे यावरून रेणुका हि सुफलनाची व भूमीची देवता असल्याचे स्पष्ट दिसते. या शिवाय रेणुकेचे मंदिर हे एका शेतात विहिरीच्या कडेला असल्याने तर अधिक या निष्कर्षाला पुष्टी मिळते. येथे दुर्गा अर्थात महिषासुरमर्दिनी, यल्लम्मा (सात माता) व रेणुका (भूमाता) यांच्या एकत्त्वाचे संकेत मिळतात. या एकत्त्वाचे संकेत रेणुका, यल्लम्मा, मरीआई, मातंगी, लज्जागौरी व दुर्गेच्या समान पूजन पद्धतीत व मातृसत्ताक समाज जीवन पद्धतीतून येणाऱ्या कृषीसंस्कृतीत, भू यातू विधित, मुर्तीशास्त्रात तसेच त्यांच्या दैवतकथेत आढळते.

## III) रेणुका-यल्लम्माच्या दैवत कथा व मुलस्वरूप :-

रेणुका-यल्लम्मा यांच्या एकत्त्वाचा वा मुलस्वरूपाचा शोध घेताना प्रथमतः त्यांच्या दैवतकथांचा संक्षिप्त रुपाने आढावा घेऊ. भारतीय १८ पुराणांपैकी स्कंद पुराणातील सह्याद्रि खंडांतर्गत श्री रेणुका माहात्म्याचा समावेश आहे त्यातील रेणुकेची कथा ही देवांच्या इच्छेनुसार स्कंदाने देवांना सांगितली आहे. ती अशी, दैत्यांनी देवांचा पराभव केल्यावर सर्व देव भयभित होऊन श्री विष्णूला शरण जाऊन रक्षणासाठी त्याची करूणा भाकू लागले तेव्हा विष्णूने मी आदितीच्या पोटी जन्म घेईन. ब्राह्मणरूपाने दानवांचा नाश करीन. पृथ्वी २१ वेळा निःक्षत्रिय करून ती ब्राह्मणांना दान देईन. माझी आई आदिती ही एकवीरा नावाने आधी जन्म घेईल. त्यासाठी तुम्ही आधी तीची प्रार्थना करा जर ती मला धारण करत असेल तर मी तिच्या पोटी जन्म घेईन. देवांच्या प्रार्थनेनुसार आदिती मग तपाचरणास सिद्ध झाली. देव, गन्धर्व, सिद्ध, विद्याधर नाग, रूद्र आणि ऋषींनी तिला आपआपले तेज दिले. तिने तपाने महादेवाला प्रसन्न करून त्याच्याकडून मला अयोनि जन्म व तु साक्षात जन्म घेऊन 'माझा पती हो' असा वर मागितला. तेव्हा शंकराने पार्वतीला तिचे तेज आदितीला देण्याची विनंती केल्यावर पार्वतीने आपले तेज आदितीला दिले. तेव्हा भागीरथी नदी काठच्या कान्यकुब्ज नगरीतील रेणू राजाने पत्नीसह कन्याप्राप्तीसाठी तप करून शंकराला प्रसन्न करून घेऊन गंगानदी तीरावर यज्ञ आरंभिला. वेदमंत्राच्या घोषात यज्ञवेदीतील ज्वालाग्नीतून आदितीने जन्म घेतला तीला रेणुका हे नाव दिले. अयोनिजा एकवीरेचा जन्म अग्निकुंडातून झाला. पुढे रेणुका उपवर झाल्यावर भागीरथी नदी काठी तिचे स्वयंवर आरंभिले. ब्रह्मदेवापासून निर्मिलेल्या भृगुकुलातील जमदग्नि ऋषीला रेणुकेने स्वच्छेने निवडले. इतर राजे व ऋषी क्रुद्ध होऊन निघून गेले.

पुढे जमदग्निपासून रेणुकेला अग्नि, इंद्र, सुर्य, वायु आणि विष्णु असे पाच पुत्र झाले. आग्निपासून वसु, वायुपासून विश्रावसु, सुर्यापासून ब्रहत्भानु व इंद्रापासून बृहत्कष्ठव व पाचवा विष्णूचा अवतार परशुराम यांचा जन्म झाला. परशुरामाने शंकराला प्रसन्न करून त्याच्याकडून धनुर्विद्या आत्मसात करून घेतली. पिनाक नावाचे दिव्यधनुष्य मिळविले. पवित्र गंगा नदीकाठी अतिशय कोपिष्ठ असणाऱ्या जमदग्निचा आश्रम होता.

बऱ्याच काळानंतर पाप नाहिसे करणारी व रामाचे कल्याण चिंतणारी रेणुका रजस्वला झाली. तीन दिवसानंतर दिव्य वस्त्र परीधान करून रेणुका सुर्योदयी गंगेवर स्नान करण्यास गेली. तेथे चित्ररथ काही प्रौढ स्त्रियांसह जलक्रिडा

करताना ऋतुशुचिर्भूत देवीने पाहिले. ते दृश्य पाहून जर माझे पती येथे असते तर मी जलक्रिडा केली असती असे तीच्या मनात आले. स्नान करून ती पतीच्या भितीमुळे स्वआश्रमात परतली. जमदग्निने तीला पाहताच अग्निप्रमाणे संतप्त झाले. संतप्त होऊन ते एकविरेला म्हणाले,

*निर्गच्छ भवनादस्मात्स्मैरिणी त्वं न संशयः।*
*अहं दुश्पारिणी दुष्टां न त्यां हन्तुं स्वयं क्षमः*
*अग्निहोत्रस्य कालोऽयं व्यतीतश्चाभवच्छुभः।*
*देवतातिथीपूजां मेऽभवन्मोघा न संशयः*
*त्वं ज्ञातासि यथा नूनं सा मूढ व्यभिचारिनी।*
*नहि मे धर्ममुंद्दिश्य भार्या भवितुमर्हसि*
*कुलं सम्पाप्तया पुष्पं कुले महतिजस्तथा।*
*अकार्य किं त्वया कार्य मम पत्न्या विगार्हितम्*
- रेणुका माहात्म्य, अध्याय २१.१३,१४,१५ व १६

वरील श्लोकातं तो म्हणतो, तु स्वैराचारी आहेस, मुर्ख व व्यभिचारिणी आहेत. तेव्हा रेणुकेने, *"आपणच नेहमी माझ्या हृदयात आहात. दुसरे कुणीच नाही. तुमच्या शिवाय दुसऱ्या कुणाचाही मी मनाने देखिल विचार करू इच्छित नाही."* असे स्पष्टीकरण दिले. परंतु रागाने क्रुद्ध झालेल्या जमदग्निने तुझा वध करणेच योग्य आहे असे सांगून आपल्या एका एका पुत्राला तिला ठार मारण्याची आज्ञा केली. परंतु त्याच्या चारही मुलांनी मातेच्या हत्येसारखे पाप जगात कोणीच करू शकत नाही असे सांगून मातृहत्येस नकार दिला. क्रोधायमान ऋषीने अवज्ञेवरून चारही पुत्रांना शाप देऊन मृत केले. परशुरामाला हाक मारताच कैलाश पर्वतावरून क्षणार्धात तेथे हजर झाला जमदग्नी त्यास म्हणाला, *"हे रामा हीच तुझी आई आहे. तिच्याच उदरातून तू जन्मला आहेस. ही गंगेवर गेली असता तिने मदनरूपी गंधर्वास कामुक भावनेने पाहिले हे मला जाणवले, हे रामा तुझ्याकडून हिची हत्या व्हावी"* त्याबरोबर रामाने एका क्षणात एकवीरा अंबेचा परशूने शिरच्छेद केला.

आज्ञाधारी पुत्रावर प्रसन्न होऊन जमदग्निने त्यास वर मागण्यास सांगितला. परशुरामाने प्रथमतः आपले भाऊ व नंतर आपल्या मातेस जीवंत करण्यास सांगितले. त्याक्षणी जमदग्निने अमृताचे सिंचन करून त्यांना जीवंत केले. जमदग्निने यानंतर आपल्या शरीरातून क्रोधाला बाहेर जाण्यास सांगितले. सर्वजण आनंदीपणे राहू लागले. काही काळ लोटून गेल्यानंतर हैहयाधिपती सहस्त्रार्जुन शिकार करीत जमदग्निच्या आश्रमाजवळ आला आश्रमातील अनेक प्राण्यांची त्याने शिकार केली पण जमदग्निला क्रोध आला नाही कारण क्रोध त्याच्यातून केव्हाच निघून गेला होता. ससैन्य तो आश्रमात आला तेव्हा त्याचे स्वागत जमदग्नि-रेणुकेने केले. त्यांना इंद्राकडून प्राप्त झालेल्या कामधेनूने अनेक पक्वाने-अन्न निर्माण करून त्यांना भोजन दिले. इतक्या शिघ्र एवढी पक्वाने कशी निर्माण झाली याचे आश्चर्य अर्जुनास वाटले. हे कामधेनू गायीने केले आहे असे समजताच त्याने ती पळवून नेण्यासाठी तेथे बळजबरी करून युद्ध केले. झालेल्या युद्धात सहस्त्रार्जुनाकडून जमदग्नि ठार झाला. रेणुकेवर २१ वार झाले. पतिच्या निधनाने शोकाकूल झालेल्या रेणुकेने परशुरामास हाक दिली. काही क्षणात तो हरज झाला. पित्याच्या हत्येची करूण कहानी रेणुकेने सांगितली. आपल्या आईच्या अंगावरील २१ वार त्याने पाहून प्रतिज्ञा केली की, मी पृथ्वी २१ वेळा निःक्षत्रीय करीन. राग अवरता घेऊन त्याने एका कावडीत मृतपित्यास व रेणुकेस बसवून कान्यकुब्जातून बाहेर पडला. तो भटकत कृष्णामलकी (माहूर) ग्रामात जेथे श्री दत्तात्रयांचा वास आहे तेथे येऊन पोहचला तेथे आकाशवाणी झाली की, तेथेच संस्कार विधी कर. दत्तात्रयाने विधी सांगितल्यावर परशुरामाने जमदग्निनंतर अग्निसंस्कार करण्यास सुरुवात केली. रेणुकेने पतीसोबत सहगमन करण्याचा निर्धार करून अग्निप्रवेश केला. रामाने श्रीदत्तात्रेयाच्या मदतीने माता-पित्याचे संस्कार केले. काही काळानंतर भूमीला फाडून रेणुका प्रकट झाली. जमदग्नि मुनिसुद्धा प्रकट झाले. रेणुकेने कार्तवीर्याचा वध करण्याची आज्ञा रामास दिली. त्याने माहिष्मती नगरात जावून घनघोर युद्धात राम स्वयं लंबोदर होऊन कुठाराने अर्जुनाच्या हृदयावर प्रहार करून त्यास ठार केले. त्यांच्याशी युद्ध २१ दिवस चालले. पुढे विविध देशात, गुहेत, पहाडावर, वनात दडून बसलेल्या राजांना शोधून रामाने त्यांना ठार केले.

यानंतर पुन्हा मातृगृही परतून शिव स्वरूपात मातापित्यांचे दर्शन घेऊन मातेस म्हणाला, *"मी तुला दिलेले वचन पूर्ण केले आहे. कार्तवीर्य सहस्त्रार्जुनाचा वध केला. श्री गणेशाने दिलेल्या परशुने त्याला ठार केले, पृथ्वी २१ वेळा निःक्षत्रिय केली. जिंकलेली पृथ्वी ब्राह्मणांना दान केली."* रेणुका पुढे तेथेच माहूरला निवास करून राहिली.[५]

रेणुका महात्म्य हे जरी स्कंद पुराणातील सह्याद्री खंडातर्गत आहे असे म्हटले तरी मुळपुराणाची रचना उत्तर प्राचीन काळात झालेली असून त्यामध्ये सह्याद्रिखंड व त्यानंतर रेणुका महात्म्य कितीतरी काळानंतर मध्ययुगाच्या सुरुवातीच्या काळात रचले गेले आहे.

रेणुका मातेची कितीतरी कथामहात्मे थोड्या वेगळ्या पद्धतीने सांगितली जातात. त्यापैकी वाडी रत्नागिरीचा क्षेत्रपाल श्री जोतीबा याचे श्री केदार विजय मध्ये म्हटले आहे, रेणुकेला स्वत:ची जाणीव बाह्यकारणाने झाल्यामुळे परशुरामाच्या हातून तिचा शिरच्छेद करविला. जमदग्निच्या वरानुसार रेणुका मातेच्या देहाला अग्निसंस्कार दिला. माता पुन्हा दिसणार नाही म्हणून तो दु:खी झाला. तेव्हा रेणुकेने मी पुन्हा अवतार घेईन तु मागे वळून पाहू नकोस असे म्हणून माहूर (मातापूर) येथे राहिली पुढे तिने सीता, तुकाई, यमाई व मोकलाई असे अवतार घेतले.[६] येथे रेणुकेला झालेली स्वत:ची जाणीव म्हणजे तिच्या मुळच्या भूमीस्वरूपा वा मातृहक्क-सत्ता परंपरेची तिला झालेली जाणीव होय. रेणुका महात्म्याप्रमाणे ती अयोनिज असून तिचा जन्म यज्ञकुंडातून सीतेप्रमाणे भूमीतून झाला आहे. पुरुषसत्ताक भार्गव (भृगु) आर्य कुळाच्या विरोधात हि स्व ची जाणीव होती.

भृगुवंशीय जमदग्निने तिच्यावर स्वैराचारी-व्यभिचारीशी असा केलेला आरोप मातृसत्ताक परंपरेतील मुक्त लैंगिक आचार दर्शवतो. चित्ररथाला पवित्र गंगा नदीत पाहून रेणुकेच्या मनात निर्माण झालेल्या आसक्ती विषयी भाष्य करताना प्रसिद्ध विद्वान एन. एन. भट्टाचार्य म्हणतात.[७] *"बहुपतिकत्त्वाची रेणुकेची इच्छा हि भारतीय मातृसत्तेचे वैशिष्ट दर्शवते. रेणुकेची परशुरामाकडून हत्या ही प्राचीन भारतीय मातृसत्तेचा विनाश दर्शवते."*

रेणुका-परशुरामाची कथा संबंध भारतभर उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत सर्वत्र रेणुकेचे शिर तिच्या पुत्राने तोडलेल्या या एकाच समान सुत्रात परंतु विविध पुटे चढवून वा भू-माता रेणुकेला आपआपल्या भाषा-संस्कृती-वंश कुलांची अभिरूपता जोडून रंगविली आहे. श्री. चाफेकर म्हणतात की, *"रेणुराजाची कन्या रेणुका परशुरामाची माता रेणुका यांचा संबंध मागाहून जोडलेला असावा."* तसेच रेणुराजाने कन्याप्राप्तीसाठी यज्ञ करणे हे मातृसत्ताक वा स्त्रीसत्ताक समाजव्यवस्थेतच अधिक संभवते पितृसत्ताक समाजव्यवस्थेत नाही. त्यामुळे वारूळ स्वरूप-भूमाता रेणुका हि नदिमातृक मातृसत्ताक समाज व्यवस्थेतून येते. महाभारतात तर रेणुकेची उत्पत्ती कमळापासून झाली असून तिला कामस्त्री असे म्हटले आहे.

गणेश पुराणात मात्र चित्ररथाला पाहून ती अपवित्र झाली असे कारण नसून रेणुकेच्या सख्ख्या बहिणीचा पती सहस्त्रार्जुन याचे आश्रमात रेणुकेने त्याचे केलेले स्वागत व कामधेनू कडून पंचपक्वान वाढून त्याचे केलेले आदरातिथ्य असे कारण आहे आणि त्यातून कामधेनू विषयी निर्माण झालेली आसक्ती, जमदग्निचा वध, रेणुकेवर झालेले २१ वार, परशुरामाने कोरी पवित्र भूमीत (कोरी म्हणजे न कसलेली) त्यांचे अग्निकाष्ठ केले. रेणुका सती जाताना तिने आपल्या रामास पाठीमागे वळून पाहू नकोस तुला सतीच्या चितेवरील यातना पाहवनार नाहीत असे केलेले कथन, परंतु मातृविरहाने विव्हल होऊन त्याने मागे वळून पाहिले. तेव्हा तिचे सर्व शरीर भस्मिभूत होऊन फक्त शिरच उरल्याने माहूरला देवीचा नुसता मुखवटाच दिसतो.[८] असे चित्रण केलेले आहे. येथे परशुरामाने मातृहत्या केलेली नाही. तर तिला सती जाण्यास अनुमती देऊन मातृविव्हल होऊन परत चितकडे पाहिले आहे. या कथेनुसार परशुरामाचा रेणुकेच्या सांगण्यानुसार दोष असा की *'संपूर्ण क्रियाकर्म होईपर्यंत जर तु धीर धरला असतास तर माझे संपुर्ण रुप प्रकट झाले असते परंतु भस्मिभूत झालेले शरीर पुन्हा तयार होण्यापूर्वीच तु मला बोलावल्यामुळे माझा जेवढा भाग तयार झाला तेवढाच तुझ्यापुढे आला.'*

महाभारतातील वनपर्वातील कथेनुसार व्रतस्थ रेणुका आपल्या पतीची आज्ञा घेऊन नदीवर स्नान करण्यासाठी गेली असता परत येताना वाटेत तिला चित्ररथ नावाच्या मार्तिकावत देशाच्या राजाचे आपल्या पत्न्यांसमवेत क्रीडा करतानाचे दृश्य दिसले. त्याचे ऐश्वर्य आणि सुख बघून रेणुकेच्या मनात त्याच्याशी क्रीडा करण्याची वासना निर्माण झाली. अंतर्ज्ञानाने हे जाणलेल्या जमदग्निने परशुरामाकडून तिचा शिरच्छेद करविला.[९]

सुप्रसिद्ध विद्ववेत्या डॉ. सरोजिनी बाबर यांनी कुलदैवत या संपादित ग्रंथात माहरू येथील प्रचलित कथा दिली आहे, त्यामध्ये 'रेणुका स्नानाला गेली असता तिने माशांचे एक जोडपे रतिसुखात मग्न असलेले पाहिले त्यामुळे तिच्या ठायी स्त्रीसुलभ भावना जागृत झाल्या तिचा मातीचा घडा कच्चा राहू लागला त्यातून पाणी झिरपू लागले तशीच ती घरी गेली, त्यामुळे जमदग्नि ऋषींना मनस्वी संताप येऊन परशुरामाच्या हस्ते तिचा शिरच्छेद करविला. तिचे शिर कैलास पर्वतावरील शंकराच्या गळ्यात नरमुंड माळेत जाऊन बसले. परशुरामाला वचन दिल्याप्रमाणे जमदग्नि ऋषींनी एका अत्यंज बाईचे शिर धडावेगळे करून ते रेणुकेच्या धडाला जोडून तिला जीवंत केले त्या अत्यंज बाईलाही त्यांनी हिच्या बरोबर तुझीही पूजा होईल असे वरदान दिले. त्यानंतर रेणुका दक्षिणेत सौंदत्तीला आली. तेथील लोकांनी तिची यल्लम्मा नावाने स्थापना केली.[१०] त्याच ग्रंथातील महारूगडवासिनी श्री रेणुका या लेखात डॉ. प्र. न. जोशी यांनी एक कथा दिली आहे. त्यानुसार माहूर हे क्षेत्र सिंहाद्री पर्वतावर आहे. रेणुकेचे मंदिर हे मातृतीर्थ जवळ असून तेथे रेणुराजा व त्याची पत्नी भेवंती यांनी बालदुर्गेची उपासना केली. या पर्वतास मूकांबिका पर्वत म्हणतात. तेथे आधी सिंहाची मग देवीची पूजा होत असे. याच

कोऱ्या भूमीवर परशुरामाने जमदग्निवर अग्निसंस्कार केले.[११] या त्यांच्या विवेचनातून रेणुका व सिंहवाहिनी दर्गा यांच्या एकत्त्वाचे पुरावे मिळतात. श्री त्रिं. गो. देशमुखांच्या संशोधनानुसार रेणुकेची तांदळा स्वरूप मुर्ती हि पाच फूट उंचीची असून ती सिंहमुखासनावर आहे. रेणुकेच्या शिखरामागील दलभंजन बुरुज असून त्यामधील एका छिद्रयुक्त शिळेची पूजा कालिका देवी म्हणून करतात. या देवीने लहान मुल खाल्ले म्हणून तिला बुजविलेले आहे म्हणून तिला चिनलेली देवी असे म्हणतात.[१२] हिची पूजा अतिप्राचीन काळापासून चालत आली असावी.

विष्णूने आपल्या सुदर्शन चक्राने सतीचे जे तुकडे केले त्यातून तिची स्तने सह्य पर्वतावर पडली त्यातून मातापूर (माहूर) हे शक्ती पीठ निर्माण झाल्याचे रेणुका महात्म्यात म्हटले आहे. रेणुका मातृदेवतेची कथा सांगणारी अनेक स्थानमहात्मे नंतरच्या काळात रचली गेली. त्यामध्ये श्री रेणुका देवी स्त्रोत, रेणुका महात्म्य, रेणुका कवच, रेणुका सहस्त्रनाम, श्री मातापूर कथासागर इ. समावेश होतो. त्याचबरोबर रेणुकेच्या दक्षिणी अनेक आकृत्यांबरोबर लोक साहित्यातही तिची अनेक कथानके लोकप्रिय आहेत त्याचा ही थोडक्यात धांडोळा घेऊ *'लोकसाहित्यातील मातृदेवता रेणुका'* या अभ्यासपूर्ण ग्रंथात प्रा. डॉ. नीला जोशी यांनी कथा दिल्या आहेत. त्याप्रमाणे रेणुराजा व राणी भोगावती मूकांबिका पर्वतावर जाऊन बालदुर्गेची उपासना करून तिच्याकडून आपल्या पोटी जन्म घेण्याचे वरदान मिळवले व यज्ञसमारंभात यज्ञकुंडातून (अयोनिज) रेणुकेचा जन्म झाला. त्यामुळे ती रेणुका ही भूदेवी असून ती कृषी परंपरेतील देवी आहे.[१३] कर्नाटक, महाराष्ट्र, आंध्र या प्रांतातील असंख्य लोकांची उपास्यदेवता असून अनेक कुटुंबांची कुलदेवता आहे. ती रेणुका, यल्लमा, एकवीरा, यमाई, मरीआई, लक्ष्मी इ. अनेक नावांनी उपासिली जाते. रेणुकेची यल्लम्मा कशी झाली याची कथा रा. चिं. ढेरे देताना लज्जागौरीचे शिल्पे हि रेणुका-यल्लम्माचीच असल्याचे सप्रमाण सिद्ध करून दाखवतात. आलंपूरच्या स्थलमाहात्म्य मधील कथा अशी,

रेणुका ही जमदग्नी ऋषींची पतिव्रता पत्नी. ती आपल्या पतिदेवाच्या नित्याच्या पुजेअर्चेसाठी लागणारे पाणी कच्च्या मातीच्या घड्यात भरून तुंगभद्रेवरून आणून देत असे. नदीवरील चिखलाचा घडा करून पाणी भरून आश्रमात जायचे हा नित्यक्रम असे. पतिव्रत्याच्या सामर्थ्यामुळे तो ओला कच्चा घडा मुळीच पाझरत नसे. एके दिवशी मात्र तुंगभद्रेत एक राजा आपल्या सुंदर पत्नींसह जलक्रीडा करतानाचे दृश्य पाहून रेणुकेचे चित्त विचलित होऊन एवढ्याश्या मानसिक स्खलनामुळे चिखलाचा ताजा घडा टिकविण्यास ती असमर्थ ठरली. ती हाताशपणे रिकाम्या हाताने परतली. कोपिष्ट पतीने सारे काही जाणून परशुरामाच्या हातून तिचा शिरच्छेद करविला. परशुरामाने मातेला सजीव करण्याचा वर मागितला जमदग्निने उत्तर दिले की, *"वत्सा तुझी आई आता पुर्णवत होणे अशक्य आहे. कारण तु उडविलेले शिर अपवित्र ठिकाणी (चाभांराच्या दुकानातील पाण्याच्या कुंडात जाऊन पडलेले असल्यामुळे ते तिच्या धडाशी एकरूप करणे ईष्ट नव्हे. परंतु एवढे मात्र घडेल की सर्व प्रकारचे लोक तिच्या शिराची उपासना 'एल्लम्मा' या नावाने करतील आणि धडाची ख्याती भूदेवी म्हणून होईल."* जमदग्निच्या या वरामुळे आलंमपूर येथे रेणुकेच्या शिराची एल्लम्मा म्हणून प्रतिष्ठा झाली आणि तिच्या धडाची भूदेवी या नावाने पूजा होऊ लागली.[१४] आलंपूरची ही रेणुका नग्न शिरोविहिन असून ती लज्जागौरीची मूर्ती आहे. रेणुकेचे प्राकृतीकीकरण होऊन ती यल्लम्मा बनली. या संदर्भात रा. चिं. ढेरे लिहितात, *"एल्लम्मा, रेणुका आणि भूदेवी हे तिन्ही नामपर्याय एकाच देवीसाठी वापरले जात होते. तिच्या मूर्तीच्या शिरोविहितेच्या स्पष्टीकरणासाठीच शिरच्छेदाच्या कथेची निर्मिती झाली, हे उघड आहे."*

दक्षिण भारतात कर्नाटकामध्ये बेळगाव जिल्ह्यात सौंदत्ती हे यल्लम्मा देवीचे प्रमुख ठाणे म्हणून ओळखले जाते. रेणुकेची यल्लम्मा कशी झाली याची कथा येथे आढळते. मुळ कथानकात असा बदल होत गेला. हा बदल दर्शवतो की, मूळचे भूमिपूत्र असलेल्या मातंगांना नवीन वसाहत करायला आलेल्या लोकांनी आपल्यात सामावून घेण्याच्या प्रयत्नाचा एक भाग होय. आर्य भृगू कुळाला मातंगांनी आपल्या वसाहतीत सामावून घेतल्याचा हा एक सांस्कृतिक ठेवा होय. व्हाईटहेड बिशप यांच्या मते *"या कथेत आर्य-द्रविड संस्कृती संगम आहे."*

यल्लम्मा हे भूदेवतेचे प्रतीक आहे. अशी एक दंतकथा पं. महादेवशास्त्री जोशी सांगतात ती कथा अशी, एल्लम्माला नव्हती आई, नव्हता बाप. ती पृथ्वीतूनच उत्पन्न झाली. नऊ वर्षाची होताच ऋतुमती झाली. आपल्याला कोणीतरी पती मिळावा म्हणून राने वने धुंडू लागली पण तिला कोणीही दादला गवसेना. मग ती जंबुऋषीकडे आली. त्याने तीला संजीव नावाचे एक रोपटे दिले. तिने ते जमिनीत पुरले त्यातून कोंबडा निर्माण झाला. तो तिला आवडला. त्याच्यासाठी ती कोंबडी झाली.तिने तीन अंडी घातली. अंड्यातून ब्रह्मा, विष्णू, महेश जन्माला आले. एल्लमाने पुन्हा स्त्रीरूप घेतले. तीला शिव खूप आवडला. तेव्हा शिव म्हणाला, हे शक्य नाही तू माझी आई झालीस तेव्हा हा वाद जंबुऋषीकडे गेला तेव्हा ऋषींना शिवास तिची अभिलाषा पूर्ण करण्यास सांगितले मोबदल्यात तिसरा डोळा दिला. शिवाने त्याप्रमाणे केले. एल्लम्मा संतुष्ट होऊन मातंगगिरीवर रहायला गेली.[१६]

या कथानकातून रेणुका अर्थात एल्लमा ही पृथ्वीतून उत्पन्न झाल्याचे म्हटले आहे. तीच्या अयोनिजत्त्वाचा पर्यायने मातृकुलाचा संकेत मिळतोच शिवाय तिच्या शिवावरच्या हक्कातून मातृहक्क अभिप्रेत होतो. तसेच परशुरामाच्या संबंधात जी लोकगीते कथागीते आहेत त्यामध्ये त्याचा उल्लेख *'बिनबापाचा पोर'* असे म्हटले जाते. संस्कृत कथा महात्म्यातून पुरुषसत्ताकता तर प्राकृत-मौखिक-दक्षिणी कथा महात्म्यातून रेणुका-यल्लम्मा मातृसत्ताक समाजव्यवस्थेतून येते. या जांबऋषी (जंबुऋषीला) मातंग लोक आपला मूळ पुरुष मानतात. मातंग आणि ब्राह्मण यांच्या संबंधाची एक कथा येते. एकदा ब्रह्मदेवाने सगळी विद्या एका मडक्यात ठेवली. मांगिणीच्या मुलीला हे समजले. ती चोरून त्या मडक्यातील विद्या प्याली. ब्रह्मदेवाने ब्राह्मणाला देण्यासाठी ती विद्या ठेवली होती. ठरल्याप्रमाणे ब्राह्मण ब्रह्मदेवाकडे गेला. ब्रह्मदेवाने सगळी हकीकत सांगितली. ब्रह्मदेवाने त्या मुलीचे शिर कापून ब्राह्मण स्त्रीच्या धडावर ठेवले आणि मांगिणीच्या घडावर ब्राह्मणीचे शिर ठेवले. तेव्हा पासून ब्राह्मणी पाणी आणताना पाणी विटाळेल म्हणून डोक्यावर घडा घेत नाहीत. मांगिणीचे शिर ब्राह्मणाने घेतले म्हणून ब्राह्मण आजही मांगांच्या घरी विधीसाठी जातो.[१७] या कथेतूनही रेणुका-यल्लम्मा- मातंगिणीच्या एकत्त्वाचे संकेत मिळतात.

श्री. आर. पी. चंदा यांनी दक्षिण भारतात प्रचलित असलेली एक दंतकथा दिली आहे त्यानुसार, यल्लमाने कोंबडी होऊन जी तीन अंडी घातली त्या एका अंड्यातून ब्रह्मा, विष्णू व महेश निर्माण झाले. दुसऱ्या अंड्यातून आकाश आणि पृथ्वी निर्माण झाली तर तिसरे अंडे कुजल्यामुळे त्यातून रोगराई निर्माण झाली. यल्लम्मा मरिआईचे रूप घेऊन पृथ्वीवर रोगराई पसरवू लागली. मातृदेवतेची तिन रूपे यातून साकार झाली. विश्वनिर्माण करणारी जगन्माता, अन्न निर्माण करणारी भूमाता आणि विश्वाचा संहार करणारी रोगदेवता. दक्षिणेत मरिअम्मा वा मरीआई जगदंबा रेणुकेचेच विनाशक रूप म्हणून पूजली जावू लागली.

दक्षिण भारतात मरिअम्मा, यल्लम्मा पोचम्मा व धुरपतम्मा या संहारकालीचे रूप घेऊन निरनिराळ्या रोगांनी सर्वांना त्रस्त करू लागल्या म्हणून त्या रोगदेवता आहेत. त्यांनाच मातृका या नावाने ओळखतात. यल्लम्मा या शब्दाचा प्र. कृ. प्रभुदेसाई आपल्या देवीकोशात अर्थ स्पष्ट करताना म्हणतात,[१८] यल्लम्मा शब्दाची व्युत्पत्ती याळू = सात आणि अम्मा = माता = सप्तमातृका अशी आहे. यली शब्दाचा अपभ्रंश यल्ल असाही असून त्याचा अर्थ विड्याचे पान जे घटात स्त्री योनीचे प्रतिक म्हणून वापरतात. यल्लमा या स्कंद माता सप्तमातृका असून त्या जलदेवता होत. दक्षिणेतील या जलदेवतेच रेणुकेच्या रूपात एकीकृत करण्यात आले. सौंदत्ती येथील यल्लम्माचे मंदिर डोंगरपठारावरील नदी पात्रातच (सरस्वती) आहे. तिच्या उपसनेत स्नानविधीला अत्यंत महत्त्व आहे. पाझरणारा घट, नागकाष्ठ, परडी (Votive tank), योनिप्रतिक कवडी, योनीकुंड इ. जलदेवता वा जलमातृकांच्या आराधनेसाठीची साधने यल्लम्माच्या आराधनेत अपरिहार्य मानली जातात. विजापूर जिल्ह्यातील मणूर हे यल्लम्मा रेणूकेचे तिर्थक्षेत्र तर भीमा नदीच्या पात्रातच असून नदीपात्रातील मंदिरात यल्लम्माच्या शिराची तर नदीकडेच्या चिक्क मणूर गावात लज्जागौरी स्वरूप नग्न यल्लम्माच्या धडाची पूजा केली जाते. या मंदिरांचे पुजारी मातंग असून मंदिरावर रतीमग्न युगुले अरेबियन पेहरावात कोरलेली आहेत.

रेणुकेच्या दक्षिणी आवृत्ती कथेत रेणुकाला मरिअम्मा मरीआई म्हणून पुजले जाते. मरीआई ही परशुरामची आई पाणी एखाद्या भांड्यात न आणता त्याच्या बर्फासारखा पाण्याचा गोळा करून सापाची चुंबळ करून त्यावरून पाणी आणत असे. ती नेसावयाचे वस्त्र हवेत आधांतरी राहून सुकत असे. या ठिकाणी ती नग्न असल्याचे समजले जाते. त्यामुळे तिची नग्नपणेच पूजा केली जाते. यल्लम्मा-मरिअम्माच्या जोगतिणी तिची नग्न आराधना करतात. जमदग्निच्या आज्ञेनुसार मरिअम्माचे शिर तोडल्यानंतर त्याने मातंग स्त्रीचे सुद्धा शिर तोडले. वरदान मिळाल्यानंतर दोघींच्या मस्तकावर शिर लावताना अदलाबदल होऊन मरिअम्माचे शिर असलेली मरिअम्मा झाली आणि अस्पृश्य स्त्रीचं शिर असलेली यल्लम्मा झ ाली. हिलाच मातंगी किंवा रेणुका म्हणतात.[१९] खरे पाहता मरिअम्मा वा मरिआईच्या उपासनेवरून दिसून येते की, ती सिंहवाहिनी दुर्गा स्वरूप महिषमर्दिनी होय. याचा आणखी एक पुरावा म्हणजे कार्ल्याची एकविरा देवी ही रेणुका समजली जाते. तिचा तांदळा (मुखवटा) हा प्रसिद्ध बौद्ध लेण्याच्या प्रवेशद्वारावरील डाव्या सिंहस्तंभाच्या जागी असून तिच्या समोरही एक छोटा सिंह आहे. दसरा अथवा तिच्या यात्रेत तिला रेडा बळी दिला जातो. दक्षिणेतील मातंग, महार, मादिगा इ. ची ती कुळदेवता आहे. तेच तिचे पुजारी असतात. मातंगीलाच ते मरगव्वा, मरिअम्मा, मारम्म, मासनम्म, मेसको व लक्ष्मी म्हणून पूजतात तर कधी रेणुका म्हणून पूजतात. डॉ. ढेरे यांच्या मतानुसार माहूर येथे जी देवी रेणुका या नावाने अधिष्ठित आहे तीच मातंगी देवी आहे. रेणुका सुद्धा दुर्गास्वरूप भूमाताच होय. मातंगीच्या दिक्षाविधित खेड्यातील सर्व मातंग कुमारिकांना एकत्र बोलावून ढोल वाजून देवीची प्रार्थना करून देवी कोणा एकीच्या अंगात घुमू लागते. नंतर एखादे वारूळ शोधून ते खणून काढून त्यात तिला बसवतात तिच्या डोक्यावर एक टोपली पालथी घालतात. लीळा गायन चालू असताना ढोल वाजविले जातात. अचानक अत्यंत वेगाने डोक्यावरील टोपली दूर उडवून वारूळाबाहेर येते. हे देवीचे अवतरण समजले जाते.[२०] मातंगी देवीचे मूळ प्रतिक वारूळ आहे हे या दिक्षाविधीतून सहज स्पष्ट होते. वारूळाच्या रूपातच दक्षिणेत अनेक

ठिकाणी रेणुका, यल्लम्मा, मातंगी यांची पूजा होते यावरून त्या भूदेवता आहे हे स्पष्ट होते. दिक्षा घेणारी मातंगी हि मातृदेवतेचे जीवंत प्रतिनिधित्त्व करते तिच्या मृत्यूनंतर तीचे देऊळ बांधून तिला देवत्त्व बहाल केले जाते. अशी अनेक स्मारक मंदिरे दक्षिणेत खेडोपाडी विखूरली आहेत. लक्ष्मीआई किंवा मरिआईमुळेच साथीचे रोग पसरतात अशी समजूत आहे. कॉलरा-पटकी-देवी (फोड) ची साथ पसरते अशी समजूत होती. त्यामुळेच प्रतिवर्षी आषाढात जत्रा करून तिचा गाडा काढण्याची परंपरा शेकडो वर्षाची आजही आहे. हा गाडा पोतराज गावच्या शिवेपर्यत नेतो. रक्त-भाताने गावची बांधणी करतो. तिला रेड्याचा बळी दिला जातो. काही ठिकाणी एखाद्या मांग स्त्रीलाच लक्ष्मी वा मरीआई करून तिला गावच्या शिवेवर ढोल वाजवत नेले जाते. आषाढ वद्य अमावस्येच्या दिवशी तिची मिरवणूक काढून शिवेपर्यंत तीला नेले जाते. तिच्या डोक्यावर एक पाटी असते. त्यात लोक धान्याचा बाखळा टाकतात. सात प्रकारची धान्ये असतात. तेथे गावशिवेवर गाव शुद्धिकरण केले जाते. अलिकडील प्रबोधन युगाच्या कायद्याच्या राज्यात तिच्या ऐवजी लक्ष्मी-मरीआईची लाकडी मुर्ती करून तिला वाजत-गाजत गावशिवेवर नेले जाते. अशाच प्रकारची पुजन परंपरा गडलिंग्जल, चंदगड, आजरा तालुक्यात महि-लक्ष्मीची यात्रा म्हणून दर बारा वर्षांनी करतात. हिच लक्ष्मी जेष्ठा वा अलक्ष्मी होय. वास्तवरुपाने ती सिंधुजनांची निर्ऋतीच होय. तिचा वैदिक जनांनी अपकर्ष केला. कधी केरसुनीच्या स्वरूपात तर कधी रोगराईची देवता तर कधी शितला देवी म्हणून अपकर्ष केला. प्राकृत जनांनी तिचा उत्कर्ष केल्यानंतर वैदिक जनांनी लक्ष्मीची महालक्ष्मी करून विष्णूची पत्नी बनविले.

आंध्रात यल्लम्माचे रूपांतरण पोचम्मा धुरपतम्मा मध्ये केले गेले. ते लंगणात यल्लम्माची कुमारिका पुरोहिता माथम्मा (मातंगी) असते. तिथले पोतराज स्त्रीवेष धारण करून (कडक लक्ष्मी) चाबकाचे फटके अंगावर ओढत आपल्या स्त्री सोबतीच्या डोक्यावर मरीअम्मा, पोचम्मा वाहत असतात.

रेणुका वारूळातून जन्माला आल्याच्या अनेक कथा आहेत. रेणु म्हणजे मातीचा कण, त्यापासून निर्माण झालेली देवी ही भूदेवी म्हणजे मुळची कृषिदेवता असावी. लज्जागौरी हिच रेणुका भूताता असल्याचे सिद्ध करताना रा. चिं. ढेरे लिहितात, *"रेणुका हे देवी नाम भूमिवाचक आहे (रेणु + का = रेणुमयी = पृथ्वी) असे असल्यामुळे तिला 'कोरी भूमी' असे म्हटले आहे. मातृदेवता सकल सर्जनाचा गर्भ प्रत्येक ऋतूत उदरी वाहत असूनही ती अखंड कुमारीच असते पुरुषतत्त्वाला ती अनेक नात्यात सांभाळते. परंतु तरीही तिचे कौमार्य भंगत नाही, हा विचार मातृदेवतेच्या उपासना परंपरेत सातत्याने नांदताना आढळतो."* मृदुल रेणूंनी बनलेले वारूळ हे रेणुकेच्या उपासनेसाठी वापरलेले जाणारे नैसर्गिक प्रतिक आहे वारूळ हे पृथ्वीच्या योनीचे गर्भशयाचे प्रतीक आहे. वारूळाच्या रूपाने पूजिली जाणारी मातंगी आणि सांतेरीतचा दोन्ही देवी रेणुकेशी समरूप-एकरूप आहेत. मातंगीचे चरित्र रेणुकेशी निगडीत आहेच. याशिवाय दक्षिण कोकण-गोमंतक (गोवा) येथे प्रसिद्ध असलेली सांतेरी ही परशुराम स्थापित असल्याचीच पारंपारिक धारणा आहे. रेणुका माहात्म्य तर तिला आदितीचा अवतार मानते. आदितीलाही उत्ताना, मही, पृथ्वी (Earth the Great Nude) असे वैदिक ऋषींनी म्हटले आहे.[२१] हि उत्ताना, मही, पृथ्वी म्हणजेच शिरोविहिन योनिस्तन नग्न लज्जागौरी प्रतिमा होय. कोकणात सांतेरी ही वारूळरूपात पूजली जाणारी भूदेवी होय. तर गोमंतकामध्ये तिचे प्रचलन 'भूमिका' या भूदेवतेमध्ये केले गेले. पोलेरम्मा म्हणजेच मरिआम्माच्या एका तेलंगणातील कथेत तिची रेड्याशी झुंज लागली तेव्हा ती वारूळात जाऊन लपून बसल्याचा उल्लेख येतो. वारूळात असणारा नाग हा पुरुषतत्त्वाचे प्रतिक म्हणून येतो. दक्षिणेतील रेणुकेच्या मूर्तीच्या हातात नेहमी नागफणा दिलेला असतो. नाग हे सुफलीकरणाचे प्रतिक आहे. रेणुका यल्लम्माचे स्थलांतरण पश्चिमेकडून भारताकडे झाल्याचे मातृदेवता व नाग या सुफलन प्रतिकावरून स्पष्ट होते. याची चिकित्सा पुढीलप्रमाणे करता येईल. बॅबिलोनियात सीमासंरक्षक देवता निन्नी (किंवा नाई) हिचे नाव सुमेरियन चित्रलिपीने जे दाखवले जाते ते नागाची जोडी काढूनच होय. इसीस (इजिप्शियन) या मातृदेवतेजवळ नाग असतो. रम्मनची प्रेयसी 'झाला' हिला नागदेवता Goddeess of Reptiles असे म्हणत. कनाईट मातृदेवता अस्तार्तेच्या हातात साप धरलेला असे तर 'ॲर्थानी' या ग्रीक मातृदेवतेला दोन सर्प अर्पण केलेले होते.[२२] परशुरामाने ज्याप्रमाणे आपल्या मातेचा शिरच्छेद केला, तद्वत इजिप्तमध्ये इसीस या देवीचे मस्तक तिच्या पुत्राने तोडल्याचा उल्लेख मिळतो.[२३] यावरून स्पष्ट होते की इजिप्शियन इसीस ही भारतीय रेणुका-यल्लमा होय. जमदग्निप्रमाणे इसीसचा पती ओसिरिसची हत्या झाली होती. तिचा मुलगा होरस म्हणजे भारतीय परशुराम होय. होरसच्या पित्याच्या खुनाचा बदला घेण्यासाठी योग्य संधीची ती वाट पाहत होती. मातृदेवतेच्या पतीचा मृत्यू हे मातृसत्ताक समाज-राज्यप्रणालित अपरिहार्य असते. भूमीसुफलनामध्ये निसर्गचक्रात पुरुषतत्त्व पर्जन्याचे जन्म-मरण अटळ असते. त्याचाच हा मानवी-भाव-परंपरेचा एक भाग होय.

लोकसंस्कृतीचे थोर अभ्यासक डॉ. स. अं. डांगे यांनी पुराकथांचा अर्थ या अभ्यासपूर्ण ग्रंथात येल्लम्मा, मरिअम्मा आणि रेणुका या तीन स्वतंत्र मातृदेवतांचे समानीकरण झाले असल्याचे सप्रमाण दाखवून दिले आहे. त्यांच्या उपासनेच्या पद्धतीतील भिन्नत्त्व त्यांनी दाखवून दिले आहे. दक्षिणेत मरिअम्मा पुढे बकरे आणि कोंबडे यांचा बळी देण्यात येतो तर

यल्लम्मापुढे हेल्याचा (महिष = रेडा) बळी देण्याचा प्रघात आहे. मरिअम्माची स्वतंत्र मंदिरे असून त्यामध्ये पुर्णाकृती शिरासह मुर्त्या आढळतात. मरिआई हि रोगराईची मुख्यतः देवी, कांजण्या इ. ची देवता होय. रेणुकेच्या स्वभावविषेशाच्या हे विरूद्ध आहे. मरिअम्मा वा मरीआईचे उपासक मोठ्या प्रमाणात मातंग-महार समाजातील असून महाराष्ट्र, उत्तर कर्नाटकात तिला रेड्याचाच बळी दिला जातो. पर्यायने ती महिषमर्दिनी दुर्गेच्या स्वरूपात येते तर यल्लम्मा = सातीआसरा (येळु = सात) किंवा सर्वांची माता यल्लारू अंबा होय. अर्थात यल्लम्मा ही जलदेवता होय. तिचे उपासक क्षत्रिय - बहुजन होय. तर रेणुका हि भूमाता असून वारूळ रूपात तिची पूजा केली जाते. कोळी, पठारे, प्रभू हे तिचे उपासक होय. भाजी - पाला - वनस्पती हाच तिचा मुख्य नैवेद्य होय. घटाच्या, कुंभाच्या स्वरूपात तिची पूजा केली जाते. तसेच नग्नस्वरूपात शिरोविहिन लज्जागौरी स्वरूपात तिची उपासना करतात. तिची पुरोहिता मातंगिणी होय.

दक्षिणेत रेणुकेच्या शिराची जागा घट घेते. हाच घट विजयादशमी नवरात्रात दुर्गेचा होतो. हाच घट देवीच्या सर्जनशील योनीचे प्रतीक म्हणून सुद्धा पूजला जातो. महाभारताच्या आदिपर्वात 'मस्तक' या अर्थाने तो वापरला गेला आहे. 'घट' किंवा 'मडके' गर्भाशयाचे प्रतीक मानले जाते. त्यामुळे ते मातृत्त्वाच प्रतीक मानले जाते. कुंभ म्हणजे पृथ्वी होय. मातीच्या कणांपासून बनलेला या अर्थाचा 'कुंळणा' हा शब्द रेणुका या शब्दाचा वाचक आहे. रेणुका मातीच्या कच्च्या घटातूनच पाणी आणत असे. रेणुकेच्या जोगतिनी नग्नावस्थेतच तिची आराधना करतात. नग्नपूजा वा नग्नमातृका या भूदेवता ठरतात. गौरीच्या सणामध्ये मुखवट्यांचीच पूजा केली जाते.[२४] हे मुखवटे मडक्यांना नाक-डोळे काढून पुजण्याची परंपरा आहे. नवरात्रात वारूळाची माती घरी आणून त्यावर घट बसवून त्यामध्ये खाऊची पाने (यली = यल्लम्मा) घालण्याचा रिवाज आहे. पेरणीपूर्वी वारूळाची माती खणून ती शेतात शिंपडण्याचाही रिवाज आहे. नागपंचमीला वारूळाची-नागाची पूजा करण्याची प्राचीन परंपरा आहे. वारूळाच्या मातीला कोरीभूमी म्हणजेच सदैव पवित्र पर्यायाने कुमारिकाच राहिलेली भूमी म्हटले जाते. त्यामुळे रेणुका हि सदैव पवित्रच मानली जाते. गार्डन ऑफ ॲडोनिस असणारी हि घटस्थापना भूमी आणि स्त्री यांची जननक्षमता, सुफलनशक्ती वाढविण्यासाठीच असते. त्यामुळे भूमी आणि स्त्री या ग्रंथाच्या लेखिका डॉ. सौ. शैला लोहिया या गौरी, लक्ष्मी, जिवती, यल्लम्मा, शीतला, इला, सप्तमातृका, रेणुका, कानबाई, भुलाबाई यांना भूदेवता स्वरूप सफलीकरणाशी निगडीत असणाऱ्या स्त्रीदेवता आहेत असे म्हणतात. यातूनच रेणुका-यल्लम्मा-मरिअम्मा-लक्ष्मी यांचा अनुबंध भूमी आणि स्त्रीशी निगडित असून त्यातून त्यांचे एकत्त्व झाल्याचे निदर्शन स्पष्टपणे येते. दोन भारतीय महाकाव्यात म्हणजे महाभारतात भुमाता रेणुका ही भार्गवरामाची (भृगुकुळ) आई असून शेवटी ती भूमीस्वरूपा होऊन वारूळ रूपातच पूजली जाते. तर रामायणात दाशरथी रामाची पत्नी सुद्धा भूमीतच सापडते आणि भूमीतच विलिन पावते. द्रविडपूर्व वा द्रविड संस्कृतीत सर्वतंत्र स्वतंत्र असणाऱ्या मातृका वा गणमाता पर्यायाने मातृदेवतांच्या मानवी प्रतिनिधीचे आर्य प्रधान वैदिक धर्मात पत्नीकरण (Spousification) होऊन पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेची बहुव्यापक सर्वसमाज समावेशक बांधणी या महाकाव्यांद्वारे अंमलात आणली गेली.

रघुकुलोत्पन दाशरथी रामाने ज्याप्रमाणे दक्षिणेतील मातृसत्ताक-स्त्रीराज्ये नष्ट केली. त्याचप्रमाणे भृगु कुलीन परशुरामाने कोकण, गोमंतक व केरळ भूमीतून मातृसत्ताक-स्त्रीसत्ताक राज्ये नष्ट केली. एका रामाने चारित्र्यावर शंका घेतल्याने भूमाता सीतेने भूमीतच समर्पण केले तर दुसऱ्या रामाने पित्याच्या आदेशानुसार मातेचे शिर कलम केले. पत्नीच्या चारित्र्यावर संशय, पातिव्रत्याची संकल्पना या पुरुषप्रधान समाजाची वैशिष्टे ठरतात. रेणुकेची हृदयद्रावक कथा म्हणजे पुरुषसत्ताक वैदिकांचे मातृसत्ताक-स्त्रीसत्ताक समाजावरील वर्चस्वाची करूण कहाणीच आहे.

हे पुरुषसत्ताक वैदिक अर्थात भृगु कोण? याचा शोध घेणे, अत्यंत महत्त्वपूर्ण ठरते. जमदग्नि-परशुरामाचे वैदिक कुळ भृगु असून ते मुळातील फ्रिजियन होय. असे अनेक प्राच्यविद्या पंडितांचे मत आहे. प्राचीन फ्रिजिया हा प्रदेश भूमध्य समुद्राच्या उत्तरेस प्राचीन ऐतिहासिक शहर ट्रॉयच्या उत्तर दिशेस व आजच्या टर्की (एशिया मायनर) च्या पश्चिमेस आहे भृगु हे फ्रिजिया मधून निष्काशित झालेले आहेत.[२५] फ्रिजियन ईडा (Ida) हि आर्यांची आदिती होय. फ्रिजियन एशिया मायनर मध्ये आल्यानंतर अर्यांनी तिचा आपल्या दैवतमंडलात स्विकार केला असावा. फ्रिजियन मातृदेवता अम्मा किंवा मा होय.[२६] हिच मा देवता म्हणजे भारतीय रेणुका होय. तिचे अंम्बा नावाशीही एकीकरण झाले आहे. भार्गव तिची पूजा करत.

हम्मुराबी राजाच्या मरणानंतर सुमेरियन साम्राज्य मोडकळीस आले आणि इ. स. पू. १७५० साली उत्तरेकडील रानटी टोळ्यांनी (फ्रिजीअन) कॅपडोशिया भागाचा ताबा घेतला. या टोळ्यांनी पुढे हिटाइट संस्कृती निर्माण केली. इ. स. १९०७ साली बोघाझकोई (एशिया मायनर) येथे या संस्कृतीचे अवशेष सापडले. त्या अवशेषानुसार मित्र, वरूण व इंद्र या भारतीय देवांचीही पूजा तेथे केली जात असे. तेथील भाजीव विटांवर या देवांची नावे कोरलेली आहेत. 'मा' ही या संस्कृतीची शक्ती देवता होती. तिला मेने देवी असेही म्हणत. पूर्वी आशिया मायनर मध्ये कॅपडोशिया या नावाचा एक जिल्हा होता. 'मा' या देवतेच्या रक्षणासाठी स्त्रीया-कुमारिका लष्करी गणवेश घालून व हातात शस्त्र घेऊन उभ्या असत. तिला प्रसन्न करून घेण्यासाठी भक्त आपले रक्त तिला अर्पण करत. या रानटी फ्रिजियन टोळ्या एशिया मायनर अर्थात

अनातेलिया येथे कॅपडोशिया या ठिकाणी मा देवतेची पूजा करीत असत. एशिया मायनर मधील प्रदेशात तिची लिबिअन 'नीथ' म्हणून पूजा करत. तिला अनौरस असा एक पुत्र झाला होता. रोमन सैनिक तिची 'मा बेलोना' म्हणून पूजा करत. 'मा' देवीचे पुजारी ढोल वाद्याच्या गजरात अंगावर तलवारीने वार करून घेत. जखमेतून वाहणारे रक्त देवीला अपर्ण करीत. बोघाझकोई येथे झालेल्या उत्खननात सापडलेल्या अवशेषवरून या देवीचा झगा लांब घड्यांचा, लांब वेणी, मस्तकावर मुकूट, डाव्या हाती देवीचे राजचिन्ह व हातात काठी असून वाघ व सिंह हे वाहन आहे याचे चित्र अवशेषात तिचा मुलगा दाखवला आहे. त्याची दाढी वाढलेली असून हातात कुऱ्हाड व काठी आहे. कमरेस खंजीर व सिंहवाहन असे त्याचे रूप असून त्याला 'ॲटिस' म्हणत.[२७] हा परशुधारी ॲटिस म्हणजेच भारतीय भार्गवराम होय. 'मा' ची भारतीय आवृत्ती म्हणजे रेणुका होय.

फ्रिजियात स्थिर झालेल्या उत्तरेकडील रानटी टोळ्या या युरोपिअन होय. फ्रिजियात स्थिर स्थावर झाल्यावर त्या स्वतःला फ्रिजियन म्हणवू लागल्या फ्रिजिअनांची संस्कृती हि बरीच प्राचीन असून अनातोलियन, हेलेनिक किंवा पेलासजिअन धर्मसंस्कृतीपूर्वीची असावी. हे फ्रिजीअन आर्य टोळ्यानी सप्तसिंधूच्या प्रदेशातून दक्षिणेत आले असावेत. मॅक्समुल्लर, ए बर्थ व ए वेबर यांच्या मते, मातृदेवतांचे उपासक फ्रिजिअन हे भृगू होय. त्यांच्या संबंध पाण्याशी आहे. ऋग्वेदामध्ये सुद्धा तसे वर्णन आढळते.[२८]

भारतात दक्षिणेकडे जी वसाहत झाली त्याचे श्रेय पुराणांचे रचनाकार कोणास देत असतील तर ते म्हणजे अगस्ति आणि भृगु यांना देतात. दंडकारण्यातील ज्या ब्राह्मणीवर बलात्कार केल्यामुळे राष्ट्र नष्ट पावले ती ब्राह्मणी भृगुच्या घराण्यातील होती, ही दंतकथा आणि भृगु कुलोत्पन्न परशुरामाचा अपरांताशी पुराणकारांनी दाखवलेला संबंध या कथा लक्षात घेता पश्चिमेकडील महाराष्ट्रातील आद्यकाळी भृगुकुलाची वसाहत येथे झाली असावी. भृगुंचा संबंध अनेक ब्राह्मणी जातींशी आहे. भार्गव हि एक ब्राह्मण जात गुजराथेत आहे. परशुरामाच्या कथेशी कोकणस्थ, देवरूखे, हैग, नंबुद्री इ. अनेक जातींचा संबंध येतो. भडोचचे जुने नाव भृगुकच्छ असे आहे. परशुरामाचे पूजन कोकणात अनेक ठिकाणी होत आहे. ऋग्वेदातील आठव्या आणि नवव्या मंडळात भृगुकुळातील भृगु, जमदग्नि, प्रयोग, कवि, वेन इ. नावांवर सुक्ते घातलेली आहेत. तर पृथुच्चवन, नेम व राम यांची नावे पहिल्या दहाव्या व मंडळात आहेत. यावरून भार्गव कुळातील व्यक्तींच्या सुक्तांचा ऋग्वेदातील प्रवेश उत्तरकालीन भागात झाला असावा असे मत श्री. व्यं. केतकर देतात. रामायणामध्ये दंडकारण्यास आरण्य स्वरूप उत्पन्न होण्यापुर्वी तेथे भृगुंची वसाहत होती असे म्हटले आहे.[२९] शतपथ ब्राह्मण, ऐतरेय ब्राह्मणानुसार भृगु हे वारूणी होत म्हणजे वरुणाचे मुलगे होय. वरुण हा पश्चिमेचा देव होय.[३०] बोघाझकोई (भारताच्या पश्चिमेकडे) येथील उत्खननात वरूण देवतेचा उल्लेख सापडतो. तर वि. का. राजवाडे वरूण लोक म्हणजे कोकणभूमी म्हणतात. कौटिल्याच्या अर्थशास्त्रानुसार डोक्यावरून पाणी आणण्याच्या पापकार्यामुळे भृगुंचा तालजंघाकडून अपमापन झाला होता. महाभारतात तालजंघाचा नाश अवुर्वने (Aurva) केल्याचा उल्लेख आहे.[३१] असाच उल्लेख अथर्व वेदात आढळतो. कोकणातील कायस्थ प्रभु आणि भंडारी वगैरे ज्या जाती एकवीरा (काली) देवीची पूजा करतात तिची कानडी नामोत्पत्ती अक्क अवैरा अशी असून ती तालजंघाचा नाश करणाऱ्या अवुर्व संबंधाने ध्यानात घ्यावी लागेल.[३२]

फ्रिजियन हे भारतातील भृगु लोक होत. हे अनेक विद्वानांना मान्य झाले आहे. काहींच्या मते ते उमादेवीचे उपासक असून सर्वम्बा व एलमा उर्फ रेणुका या देवतांना मानत असत. नारदीय सुक्ताप्रमाणे या रेणुकेलाच एकवीरा म्हणत. गोपथ ब्राह्मण, शतपथ ब्राह्मण व ऐतरेय ब्राह्मण यांच्यामते भृगु हा वरूणाचा मुलगा होय. म्हणून त्यांना वारूणी म्हणत असावेत. प्र. कृ. प्रभुदेसाई यांच्यामते, फ्रिजिअन लोक व्यापारासाठी भारतात येऊन स्थायिक झाले असल्याचे संभवनीय आहे. भृगुवंशीयांनी भृगुकच्छ शहर वसविले. परशुरामाचे आणि सहस्त्रार्जुनाचे भांडण होण्यास आणि त्याचे रूपांतर युद्धात होण्यास प्रमुख कारण म्हणजे परदेशी व्यापार आणि त्यामुळे मिळणारा अफाट नफा हेच होते. अमरकोशानेही मा (फ्रजिअन), अम्मा, मात्री, भार्गवी, रमा व लक्ष्मी ही एकाच देवतेची नावे होत असे म्हटले आहे.

## IV) यात्रेचे स्वरूप :-

रेणुकाच्या यात्रेतील तिचे वैधव्य आणि चार महिन्यानंतर तिचा पुन्हा विवाह याचा पौराणिक संदर्भ लक्षात घेतला तर, सहस्त्रार्जुन म्हणजेच कीर्तविर्याने जमदग्निच्या आश्रमातील कामधेनू पळवून नेताना अपयशी ठरल्याने त्याने रेणुकेचा पती जमदग्निला ठार मारले. पतीच्या निधनाने दु:ख-क्रोधाने विव्हल झालेल्या रेणुका मातेने आपली कांकणे व मंगळसुत्र काढून परशुरामास हाक मारते. पुत्र परशुराम कैलास पर्वतावरून येताच तो सर्व परिस्थिती जाणून घेतो. माता रेणुकेच्याअंगावरील 21 वार पाहून क्रोधाने पृथ्वी 21 वेळा नि:क्षत्रीय करण्याचे ठरवतो. पिता जमदग्निस अमृताने न्हाऊ घालून पुन्हा जिवंत करतो. जमदग्निचा वध ज्या दिवशी झाला म्हणजे ज्या दिवशी रेणुकेला वैधव्य आले तो दिवस रांडव पुनव (मार्गशिर्ष पौर्णिमा) म्हणून मानला जातो. या दिवशी किच करून स्त्री भक्त-जोगतिणी आपला चुडा फोडतात.

परशुरामाने जमदग्निला चार महिन्यानंतर अमृताने जिवत केले तो दिवस म्हणजे नव्याची पुनव, अहेव पुनव, हौर्सुल पुनव किंवा जेष्ठी पौर्णिमा होय. हा चार महिन्याचा काळ देवीच्या वैधव्याचा काळ मानला जातो.[35] चैत्री पौर्णिमेला रेणुका-यल्लम्माच्या जोगतीणी पुन्हा नवा हिरवा चुडा हातात भरतात. पुरण-पोळ्यांचा-शाक-भाज्यांचा नैवेद्य देवीस दाखवतात. आळते गावच्या रेणुकेच्या यात्रेतील बाळ जोगी हा जमदग्निचा जीवंत पुरुष प्रतिनिधी अर्थात ब्राह्मण असतो. देवीचा तो नियतकालीक पतीची भूमीका साकारत असतो. रेणुकेच्या वर्षभराच्या पूजेत यात्रेत सर्वाधिक महत्त्व तिच्या वैधव्याची व पुन्हा विवाहाचा विधी यालाच आहे. त्यात कुठेही तिच्या पुत्राकडून होणाऱ्या शिरेच्छेदाला महत्त्व नाही. यावरून तिच्या शिरच्छेदाची कथा नंतरहून मुळ कथानकात घुसडवली असावी. तसेच आळते येथे जमदग्निचे कुठेही मंदिर नाही. तसेच ते सौंदत्ती, कर्ला, कोकुटनूर, जत, मणूर, जोगुळबाबी वा आलमपूर येथेही नाही. या सर्व देवस्थान ठिकाणी प्रधानदेवता मातृदेवता भूस्वरूपा रेणुका-यल्लमाच आहे. यावरून ती मातृसत्ताक-स्त्रीप्रधान समाजव्यवस्थेतून आली असावी असे अनुमान निघते. भूमातेची पूजन परंपरा मातृसत्ताक लोकसंस्कृतीतून रेणुकेच्या रूपाने आजच्या हाय-टेक युगातही तिची उपासना सुरु आहे. भूमातेच्या अर्थात रुणेकेच्या या उपासने विषयी रा. चिं. ढेरे लिहितात, हा चार महिन्यांचा काळ देवीच्या वैधव्याचा काळ मानला जातो. या दोन्ही तिथींचा भूदेवीच्या संदर्भात विचार करता असे उघड दिसते की, पिकांच्याकपानीनंतर भूमीला जी कळा प्राप्त होते, ती वैधव्य सूचक होय आणि पुन: वर्षाच्या प्रारंभी नव्या पिकांचा गर्भ वाहण्याची तिला प्राप्त होणारी क्षमता ही सौभाग्यलाभाची द्योतक होय.

काही विद्वानांनी पौराणिक कथांचा अर्थ (Constellation) आकाशातील नक्षत्रविद्येच्या साह्याने लावण्याचा प्रयत्न केला आहे. कारण आकाशातील नक्षत्रांना मानव-प्राण्यांची रूपे देऊन त्याभोवती आदिम समाजाने कथानके निर्माण करून पृथ्वीवरील पिक-पाणी, हवामानाचे ठोकताळे बांधून त्यांचे सण-उत्सव-यात्रा सुरु केल्याचे दिसून येते. रेणुका मातेचे कथामहात्म्य सुद्धा याच अनुबंधातील असावे. कार्तिक महिन्यात आकाश निरभ्र असते. तेव्हा अर्जुनी नक्षत्र येते. नक्षत्रातील कथानकाप्रमाणे (रचनेप्रमाणे) सहस्त्रार्जुन जीमूताग्नीचा (जमदग्नीचा) नाश करून गा (Lupus) पळवितो म्हणून मार्गशिर्ष महिन्यात रेणुका विधवा होते. तेव्हा आकाशात 'बाजल नक्षत्र' (Ursa Major) असते. (कृत्तिका नक्षत्र, सात ताऱ्याचे; येळु अम्मा) यास कर्नाटकात हौर्त्सुल नक्षत्र म्हणतात. या नक्षत्रकातील पौर्णिमा हौर्त्सुल हुन्नवे (विधवा पौर्णिमा) अर्थात मार्गशिर्ष पौर्णिमा म्हणून साजरी करतात. पृथ्वीवरील शेतीच्या कपाणीनंतर ग्रीष्मातील कडक उन्हामुळे पुढील चार महिने भूमी ओसाड बनते. अर्थात पृथ्वी विधवा होते. त्यानंतर चैत्र महिन्यात वृक्ष, वनस्पतींना नवी पालवी फुटते, तेव्हा नक्षत्रपुंज आकाशात दिसतात. चैत्र महिन्यातील पौर्णिमेला भूदेवता रेणुकेच्या वारूळाची पूजा करतात. तिला हिरवा चुडा व हिरवी साडी नेसवतात तो दिवस चैत्री पौर्णिमा (नव्याची पुनव) असते.

## V) निष्कर्ष:-

वरील प्रकारे संस्कृत साहित्य, लोककथा, मुर्तीशास्त्र, प्राच्यविद्या, मानववंशशास्त्रीय विवेचनावरून आळते गावच्या रेणुकेचे मुलस्वरूप व वास्तव स्वरूप समजण्यास मदत होते. अशा स्थितीत तिच्या मुळस्वरुपाचा शोध घेऊन समाजाला सत्य स्वरुप समजावण्याच्या उद्देशाने प्रस्तुत शोधनिबंधाचे लेखन केले आहे. भूमाता रेणुका भारतातील अनेक जाती जमातींची कुलमाता आहे. २१ व्या हाय-टेक युगातही रेणुकेची उपासना प्रचलित श्रध्दा - अंधश्रध्दा कथा- गितानुसार मोठया प्रमाणात केली जात आहे.रेणेकेच्या कथा-गाथा उपासक, पूजा पद्धतीवरून रेणुकेची शतकानुशतके स्थितंतरे कशी होत गेली याची माहिती मिळते. रेणुका ही भूमाता अर्थात अदिम मानवाने सुफलन शक्ती असणाऱ्या भूमीलाच माता - रेणुका मानल्याचे स्पष्ट होते. रेणुकेलाच दक्षिणेत यल्लमा - सातमाता नावाने उपासिले. निसर्गतत्वानुकूल पिढयान पिढया रेणुकेच्या कथा गितांना अनेक पुटे चढविली. भारतातल्या शेकडोनशेकडो जाती - कुळींच्या तना-मनावर आजही रेणुका ठाण मांडून आहे.मातृदेवता रेणुकाही पश्चिम आशियातून भारतात आल्याचे स्पष्ट होतेच शिवाय अनार्य-आर्य यांच्यातील वर्ण संघर्ष, पितृसत्ताक समाज-राज्यव्यवस्था विरूद्ध मातृसत्ताक समाज-राज्य व्यवस्थेतील संघर्ष अधोरेखित होतो. रेणुकेच्या कथानकाला वर्गसंघर्षची सुद्धा झालर आहे. त्यातून अपरिहार्यपणे येणारा संस्कृती-वर्ग समन्वय सुद्धा झाल्याचे दिसते. या सर्व अनुशंघाने रेणुकेची कथा पुरुषसत्ताकतेच्या सुरुवातीची नांदी ठरते.

## संदर्भ :-

१. कोल्हापूर जिल्हा गॅझेटिअर, उपरोक्त पान नं. ६५३
२. कित्ता पान नं. ६५३
३. महाराष्ट्र व गोवे शिलालेख-ताम्रपटांची वर्णनात्मक संदर्भसूची,शासकीय मुद्रणालय,कोल्हापूर,१९८४ पान नं.११७ व ११८
४. मुलाखत श्री. मानसिंग शंकरराव कदम, रेणुकादेवीचे गुरव दि. १०/११/२०११

५. श्री रेणुका माहात्म्य (श्री स्कंद पुराणातील,सह्याद्री खंडांतर्गत),रेणुका प्रकाशन,अकोला,प्रथमावृत्ती २००९खंड१पाननं. ५२
६. श्री केदार विजय, रामतत्त्व प्रकाशन, बेळगाव, आवृत्ती पाचवी, अध्याय २७ वा पान नं. ४४
७. Bhattacharyya N. N., Indian Mother Goddesses, Indian Studies, Calcutta, First edi. १९७१ Page No. २५
८. प्रभुदेसाई प्रल्हाद कृष्ण, देवीकोश, आदिशक्तीचे विश्वस्वरूप, खंड-२, द्वितीयावृत्ती २००५, पान नं. ७५६,७५७
९. डॉ. डांगे सदाशिव अंबादास,पुराकथांचा अर्थ वाद आणि विवेचन,कॉन्टिनेन्टल प्रका.पुणे,प्रथमावृत्ती १९९३, पान नं. २१७
१०. डॉ. बाबार सरोजिनी (संपा.), कुलदैवत महाराष्ट्र रज्ञज्य लोकसाहित्य समिती, फोटोझिंको, पुणे, द्वितीय आवृत्ती, १९९२ पान नं. ५९१, ५९२
११. डॉ. बाबार सरोजिनी (संपा.), उपरोक्त पान नं. ५९६, ५९७
१२. प्रा. डॉ. जोशी नीला, लोकसाहित्यातील मातृदेवता रेणुका, शब्दवेल प्रकाशन, प्रथमावृत्ती २०१०, पान नं. ८
१३. ढेरे रा. चिं. लज्जागौरी, श्रीविद्या प्रका. पुणे, तृतीयावृत्ती २००४ पान नं. ४१ व ४२
१४. प्रा. डॉ. जोशी नीला, उपरोक्त, पान नं. ९
१५. प्रा. डॉ. मांडे प्रभाकर, मांग आणि त्यांचे मागते, गोदावरी प्रका. औरंगाबाद, प्रथमावृत्ती १९९९, पान नं. ६९.
१६. प्रभुदेसाई प्र. कृ., उपरोक्त पान नं. ६२६
१७. चित्रलेखा (साप्ताहिक), मातृपूजन विश्वभजन, रेणुका, दि. ३ ऑक्टो. २०११ पान नं. ४७
१८. ढेरे. रा. चिं. लज्जागौरी, उपरोक्त पान नं. ६४
१९. कित्ता पान नं. ५५ व ५६
२०. प्रा. डॉद्य परांजपे तारा, उपरोक्त पान नं. ३२
२१. प्रभुदेसाई प्र. कृ., उपरोक्त खंड-२, पान नं. ७६०.
२२. डॉ. डांगे स. अं., उपरोक्त, पान नं. २२२
२३. चित्रलेखा (साप्ताहिक), उपरोक्त, पान नं. ४५, ४६ व ४७
२४. Dikshit S. K.,The Mother Goddess,The International BVook Service,Poona, Page No. 56
२५. Dikshit S. K. Ibid, Page No. 59 and 61
२६. प्रभुदेसाई प्र. कृ., उपरोक्त पान नं. १२६२ व १२६३
२७. Dikshit S. K., Ibid, Page No. 56 and 57
२८. डॉ. केतकर श्रीधर व्यंकटेश, प्राचीन महाराष्ट्र,वरदा बुक्स, पुणे,आवृत्ती दुसरी १९८९,पान नं. १६
२९. Dikshit S. K., Ibid Page No. 59
३०. O p cit Page No. 58
३१. प्रा. डॉ. जोशी नीला,लोकसाहित्यातील मातृदेवता रेणुका,शब्दवेल प्रकाशन,प्रथम आवृत्ती 2010, पान नं.24 व 25



**प्रा. रामचंद्र गुर्लिंग घुले**
**सहा. प्राध्यापक( इतिहास) , मा. व. पा. कन्या महाविद्यालय,इस्लामपूर, ता. वाळवा जि. सांगली.**